# बृहन्मुंबई महानगरपालिका
## परिपत्रक
## २०२४-२०२५

क्र.साप्रवि/एफजीआर/०६ दि.३०.०९.२०२४

विषय : ८० वर्षे व त्यावरील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनात दि.१ जानेवारी २०२४ पासून वाढ करण्याबाबत.

संदर्भ : १) शा.नि.क्र.सेनिवे/२०१९/प्र.क्र.५९/सेवा - ४ दि.२४.०१.२०१९
२) शा.नि.क्र.सेनिवे/२०१९/प्र.क्र.५९/सेवा - ४ दि.३०.०७.२०१९
३) परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/१२ दि.२०.०९.२०२१
४) शा.नि.क्र.सेनिवे/२०२१/प्र.क्र.६४/सेवा – ४ दि.१६.०१.२०२४
५) प्रशासक (स्थायी समिती) ठराव क्र. ५६४ दि.२९.०७.२०२४
६) प्रशासक (महानगरपालिका) ठराव क्र. ३५८ दि.०५.०८.२०२४

शासन निर्णय क्र.सेनिवे/२०१९/प्र.क्र.५९/सेवा - ४ दि.२४.०१.२०१९ आणि शासन निर्णय क्र. सेनिवे/२०१९/प्र.क्र.५९/सेवा - ४ दि.३०.०७.२०१९ मधील निर्देशांच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ८० वर्षे व त्यावरील निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतनात दि.०१.०१.२०१९ पासून वाढ करण्याबाबतच्या सूचना परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/१२ दि.२०.०९.२०२१ अन्वये यापूर्वीच प्रसारित केल्या आहेत.

सांप्रत शासन निर्णय क्र. सेनिवे/२०२१/प्र.क्र.६४/सेवा – ४ दि.१६ जानेवारी २०२४ च्या धर्तीवर, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ८० वर्षे व त्यावरील निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतनात, दि.०१.०१.२०२४ पासून सुधारणा करण्याच्या प्रस्तावास, स्थायी समिती ठराव क्र.५६४ दि.२९.०७.२०२४ अन्वये प्रशासक (स्थायी समिती) यांची व महानगरपालिका ठराव क्र.३५८ दि.०५.०८.२०२४ अन्वये प्रशासक (महानगरपालिका) यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

यास्तव, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ८० वर्षे व त्यावरील निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतनात, दि.०१.०१.२०२४ पासून खाली नमूद केलेल्या दराने सुधारणा करण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | वय वर्षे ८० ते ८५ | मूळ निवृत्तिवेतनात २०% वाढ |
| २ | वय वर्षे ८५ पेक्षा अधिक ते ९० | मूळ निवृत्तिवेतनात ३०% वाढ |
| ३ | वय वर्षे ९० पेक्षा अधिक ते ९५ | मूळ निवृत्तिवेतनात ४०% वाढ |
| ४ | वय वर्षे ९५ पेक्षा अधिक ते १०० | मूळ निवृत्तिवेतनात ५०% वाढ |
| ५ | वय वर्षे १०० पेक्षा अधिक | मूळ निवृत्तिवेतनात १००% वाढ |

सदर लाभ केवळ दि.०१.०१.२०२४ पासून देय राहील, तत्पूर्वी वयोमानानुसार वाढीव निवृत्तिवेतन घेत असलेल्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना सुधारित दरानुसार फरकाची रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना ज्या महिन्यात वयाची ८० / ८५ / ९० / ९५ / १०० वर्षे पूर्ण होतात, त्या महिन्याच्या १ तारखेपासून त्यांना वाढीव दराने निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय राहील.

या निर्णयामुळे प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणा-या निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन वाढीच्या रकमेचे आणि थकबाकीच्या रकमेचे परिगणन / अधिदान करण्याची जबाबदारी प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या अखत्यारीतील निवृत्तिवेतन उपविभागाची राहील.

सदर वाढीव निवृत्तीवेतनाचा लाभ देताना जानेवारी २०२४ ते ऑगस्ट २०२४ या महिन्यांसाठीच्या थकबाकीची रक्कम माहे सप्टेंबर २०२४ च्या निवृत्तीवेतनासमवेत आकारावयाची आहे.

सदर परिपत्रकाची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या mybmcemp.mcgm.gov.in या संकेतस्थळावर circulars/Jt. M.C.(G.A)/Dy.C.A (Estt-2)/FGR/2024 येथे उपलब्ध आहे.

सही/- दि.२१.०८.२०२४
श्रीम. वैशाली देसाई
उप प्रमुख लेखापाल (आस्थापना २)

सही/- दि.२६.०८.२०२४
श्रीम. पूजा शेटे
प्रमुख लेखापाल (कोषागार) प्र

सही/- दि.२८.०८.२०२४
श्री. सुनील जाधव
प्रमुख लेखापाल (वित्त)

सही/- दि.३०.०८.२०२४
श्री. प्रशांत गायकवाड
उप आयुक्त (वित्त)

सही/- दि.३०.०८.२०२४
श्री.मिलिन सावंत
सह आयुक्त (सामान्य प्रशासन)

सही/- दि.०३.०९.२०२४
डॉ. अश्विनी जोशी
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)

सही/- दि.१९.०९.२०२४
श्री. अभिजित बांगर
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प)

सही/- दि.२५.०९.२०२४
श्री. भूषण गगराणी
महानगरपालिका आयुक्त

## परिपत्रक
## २०२४-२०२५

क्र.साप्रवि/एफजीआर/०६ दि.३०.०९.२०२४

प्रत ...................................... यांना माहितीकरिता ( ............ ज्यादा प्रतींसह) आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरिता रवाना.

mkabadi 30/9/24

उप प्रमुख लेखापाल (आस्था २) यांज करिता